महाराष्ट्र विनियोजन अधिनियम, २०१८ निधी वितरण सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात महिला व बाल विकास विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांकरिता २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण व २२५१-सचिवालय -सामाजिक सेवा खालील निधी वितरणाबाबत...........

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक : मबाआ-२०१८/प्र.क्र.६४/का.०७

नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ एप्रिल, २०१८

वाचा : १) शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि.०२/०४/२०१८
२) शासन परिपत्रक क्र.बीजीटी-२०१८/प्र.क्र.३३/का-४ दि.०५/०४/२०१८

प्रस्तावना :-

सन २०१८-१९ या वर्षात महिला व बाल विकास विभागांतर्गत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे व त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयातील कर्मचारीवृंदांचे वेतन व ठेव संलग्न योजना इ. तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण इ. इ. बाबींचे वित्त विभागाच्या अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BEAMS) वर विभागास वितरीत केलेला निधी वितरीत करावयाची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात महिला व बाल विकास विभाग, मागणी क्र.एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण तसेच मागणी क्र.एक्स-२, २२५१, सचिवालय - सामाजिक सेवा या लेखाशिर्षांतर्गत महिला व बाल विकास विभागास प्राप्त एकूण निधीच्या ७० टक्के निधी वितरीत करण्यास उपरोक्त वाचा क्र.१ येथील परिपत्रकान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. यानुसार सन २०१८-१९ च्या माहे डिसेंबर पर्यतचा ९ महिन्यांचा खर्च भागविण्यासाठी अनिवार्य व कार्यक्रमावरील खर्चाचा अर्थसंकल्पीत निधी एकूण वार्षिक तरतूदींच्या ७० टक्केच्या मर्यादित वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे. तसेच महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी केलेल्या मागणीप्रमाणे तथापि, ७० टक्केच्या मर्यादित वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

तरी सदरचा निधी खालीलप्रमाणे अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BEAMS) वर वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

(रु.हजारात)

	महिला व बाल विकास - मागणी क्रमांक -एक्स-१ २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण	लेखाशिर्ष		अर्थसंकल्पित निधी	वितरीत करावयाचा ७० टक्के निधी
१	(०१) महिला व बाल कल्याण संचालनालय	२२३५ २०७२	०१-वेतन	२५००००	१७५०००
२	(२३)(०१) संरक्षण अधिकारी (अनिवार्य)	२२३५ A ८५७	०१-वेतन	११९६६२	८३७६३
३	(०१) (०१) ठेव संलग्न विमा योजना (अनिवार्य)	२२३५ २२५२	५०-इतर खर्च	३००	२१०

	महिला व बाल विकास - मागणी क्रमांक -एक्स-१ २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण	लेखाशिर्ष		अर्थसंकल्पित निधी	वितरीत करावयाचा निधी (मागणीप्रमाणे)
१	(००)(०१) महात्मा गांधी प्रशीक्षण संस्था पुणे या संस्थेचा विस्तार व विकास आणि सक्षमीकरण (कार्यक्रम)	२२३५ A ७३२	१७- संगणक खर्च	३००	१००
			२०- इतर प्र.ख.	४९४००	१८००
			२१-पुरवठा व सामग्री	३००	२१०

महिला व बाल विकास विभाग, मागणी क्रमांक एक्स-२, २२५१ - सचिवालय - सामाजिक सेवा

(रु.हजारात)

	मागणी क्र. X-२ २२५१-सचिवालय-सामाजिक सेवा	लेखाशिर्ष		अर्थसंकल्पित निधी	वितरीत करावयाचा निधी (मागणीप्रमाणे)
१	(००) (०१) शासकीय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण. (कार्यक्रम)	२२५१ १०३१	५०-इतर खर्च	१००००	१६००

०२. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सूपुर्द करण्यात येत आहे. मंजूर निधीचे जिल्हानिहाय वाटप वाटप करण्यास आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

०३. सदरचा खर्चास वित्त विभागाच्या दि. ०२.०४.२०१८ च्या परिपत्रका सोबतच्या परिशिष्टात नमूद बाबी व परिपत्रकातील परिच्छेद क्र. २ ते ११ मधील या आदेशास लागु होणाऱ्या अटींची पुर्तता होत असल्याने, विभागाच्या स्तरावरुन निधी कोषागारातून आहरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

०४. सदरचा निधी खर्च करतांना महाराष्ट्र अर्थसंकल्प करताना महाराष्ट्र अर्थसंकल्प पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिका यामध्ये उल्लेख केलेल्या तरतूदींनुसार व वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळाद्वारे उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०४१२१०२६५९१४३० असा आहे. सदरचा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a249 4e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.04.16 15:32:52 +05'30'

(ला. रा. गुजर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे

२. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (आयुक्तालय, पुणे मार्फत)
४. सर्व अधिदान व लेखा अधिकारी, (आयुक्तालय, पुणे मार्फत)
५. सर्व निवासी लेखा परिक्षा अधिकारी, (आयुक्तालय, पुणे मार्फत)
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (आयुक्तालय, पुणे मार्फत)
७. सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय, पुणे मार्फत)
८. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, महाराष्ट्र (आयुक्तालय, पुणे मार्फत)
९. कक्ष अधिकारी, वित्त विभाग (व्यय-६/अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई
१०. निवडनस्ती-का.७